दैनिक www.esuryodaylive.com
महाराष्ट्र

# सूर्योदय

Email : suryodaykokan.123@gmail.com

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)
निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




पुणे || वर्ष ६ वे || अंक १३८|| रविवार १७ मे २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## नाशिकमध्ये ६ दरोडेखोरांचा ज्वेलर्सवर सिनेस्टाईल हल्ला; कर्मचाऱ्याला बेदम मारहाण, दोन आरोपींना बेड्या

नाशिक : नाशिक शहरात एका अंगावर काटा आणणाऱ्या घटनेने मोठी खळबळ उडवून दिली आहे. शहरातील गजबजलेल्या हिरावाडी परिसरात शुक्रवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास सहा सशस्त्र दरोडेखोरांनी एका दागिन्यांच्या दुकानावर सिनेस्टाईल दरोडा टाकला. हत्यारांसह दुकानात घुसलेल्या या लुटारूंनी थेट गोळीबार करत कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण केली आणि सोन्याच्या दागिन्यांची लूट करून पोबारा केला. या घटनेमुळे संपूर्ण नाशिकमध्ये भीतीचे आणि दहशतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही धक्कादायक घटना पंचवटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या न्यू समृद्धी ज्वेलर्समध्ये घडली आहे. या संपूर्ण थराराचा सीसीटीव्ही व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, त्यात दरोडेखोरांचा राडा आणि महिला दुकान मालकाने दाखवलेले धाडस स्पष्टपणे पाहायला मिळत आहे.




### बंदुकेचा धाक आणि महिलेचा अभूतपूर्व प्रतिकार

रात्री दुकान बंद करण्याची लगबग सुरू असतानाच, तीन दुचाकींवरून आलेल्या सहा जणांच्या टोळक्याने दुकानात अचानक प्रवेश केला. त्यावेळी दुकानाच्या मालकीण नयना पगारिया, एक महिला कर्मचारी आणि अमित श्रीमाळी हे कर्मचारी उपस्थित होते. आरोपींनी थेट त्यांच्यावर पिस्तूल रोखले आणि विरोध केल्यास गोळ्या घालण्याची धमकी दिली. मात्र, या जीवघेण्या प्रसंगातही नयना पगारिया यांनी जराही न डगमगता त्या सशस्त्र दरोडेखोरांशी दोन हात करण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि त्यांना कडवा विरोध केला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार आणि दुकान मालकाने दिलेल्या तक्रारीनुसार, लुटमारीला विरोध होताच एका दरोडेखोराने दुकानात गोळीबार केला, ज्यामुळे मोठा गोंधळ उडाला. यादरम्यान, दुकानातील धाडसी कर्मचारी अमित श्रीमाळी यांनी दरोडेखोरांना पकडण्याचा आणि त्यांना रोखण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु, आरोपींनी त्यांच्यावर क्रूरपणे हल्ला चढवला.

### डोक्यावर पिस्तुलाचे वार, कर्मचारी आयसीयूमध्ये

पोलिसांनी सांगितले की, दरोडेखोरांनी अमित श्रीमाळी यांच्या डोक्यावर पिस्तुलाच्या मागच्या भागाने सपासप वार केले. या अमानुष मारहाणीत श्रीमाळी गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाला. त्यांना तातडीने जवळच्या एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

### ''मी अजिबात घाबरले नाही...'' मालकिणीने सांगितला थरार

या भयंकर प्रसंगाचे वर्णन करताना नयना पगारिया म्हणाल्या की, गोळीबार होऊनही त्यांनी आपला प्रतिकार थांबवला नाही. ''आम्ही दुकानातील दागिने पिशव्यांमध्ये भरत होतो, तितक्यात तोंडाला रुमाल बांधलेले सहा जण आले आणि त्यांनी थेट आमच्यावर बंदुका रोखल्या. मी अजिबात घाबरले नाही आणि त्यांना रोखण्याचा पूर्ण प्रयत्न केला,'' असे त्या म्हणाल्या. नयना पगारिया पुढे म्हणाल्या, ''माझा सहकारी श्रीमाळी यानेही त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. मी दरोडेखोरांना पळवून लावण्यासाठी काऊंटरवरून थेट त्यांच्या अंगावर ताट भिरकावले आणि त्यांना पकडण्यासाठी मी काऊंटरवरही चढले.'' त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे आणि आरडाओरडीमुळे दरोडेखोरांचे धाबे दणाणले. घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी दागिन्यांचे काही बॉक्स घेतले आणि तेथून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि विविध पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सीसीटीव्ही फुटेज आणि मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत तपासाची चक्रे वेगाने फिरवत दोन संशयित आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. उर्वरित फरार आरोपींचा कसून शोध घेतला जात असून लवकरच त्यांच्याही मुसक्या आवळल्या जातील, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## सोने आयातीवर १०० किलोंची मर्यादा; सरकारचा मोठा निर्णय

नवी दिल्ली : सोने, चांदी, प्लॅटिनम आदी मौल्यवान धातूंच्या आयात शुल्कात मोठी वाढ केल्यानंतर सरकारने 'ॲडव्हान्स ऑथरायझेशन' योजनेंतर्गत सोने आयातीवर १०० किलोची मर्यादा घातली आहे.



सोने दागिने निर्यातदारांना कच्चा माल किंवा इतर शून्य शुल्कात आयात करण्याची परवानगी या योजनेअंतर्गत मिळते. सरकारने सोन्याच्या आयातीसाठी ॲडव्हान्स ऑथरायझेशन जारी करण्याच्या आणि त्यावर लक्ष ठेवण्याच्या अटी आता कडक केल्या आहेत. यापूर्वी या योजनेअंतर्गत सोने आयातीवर कोणतीही मर्यादा नव्हती.

आता सोन्याच्या आयातीसाठी 'एडव्हान्स ऑथरायझेशन' योजनेत जास्तीत जास्त १०० किलो मर्यादेच्या अधीन राहून जारी केले जाईल, असे 'विदेश व्यापार महासंचालनालयाने' (डीजीएफटी) सार्वजनिक नोटिसीत म्हटले आहे. पहिल्यांदा अर्ज करणाऱ्या अर्जदाराच्या बाबतीत, त्या युनिटचे अस्तित्व, क्षमता आणि कार्यात्मक स्थिती सत्यापित करण्यासाठी अर्जदाराच्या उत्पादन सुविधेची सत्त्कीची प्रत्यक्ष तपासणी केली जाईल.

सोन्याच्या आयातीसाठी कोणतेही पुढील ॲडव्हान्स ऑथरायझेशन किमान ५० टक्के निर्यात दायित्व पूर्ण केल्यानंतरच जारी करण्यासाठी विचारात घेतले जाईल. ॲडव्हान्स ऑथरायझेशनधारकाला दर पंधरवड्याला कामगिरी अहवाल सादर करावा लागेल.

स्वतंत्र चार्टर्ड अकाऊंटंटने प्रमाणित केलेल्या या अहवालात आयात आणि निर्यात केलेल्या सोन्याचे तपशील असणे आवश्यक आहे. याशिवाय संबंधित प्रादेशिक प्राधिकरण ॲडव्हान्स ऑथरायझेशन जारी करण्याबाबतचा मासिक अहवाल डीजीएफटीला सादर करेल.

## भारत विकास परिषद दिव्यांग केंद्रातर्फे मिळणार मोफत पाय : रत्नागिरीत २४ मे रोजी मोजमाप शिबिर : गरजू दिव्यांगांनी नोंदणी करण्याचे आवाहन

रत्नागिरी : भारत विकास परिषद दिव्यांग केंद्र (पुणे) आणि स्कॉन प्रो. फाउंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ स्कॉन प्रो यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांगांना मोफत कृत्रिम पाय देण्यात येणार आहेत. याकरिता रत्नागिरीत २४ मे रोजी मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत १०० दिव्यांगांनी नोंदणी केली आहे. अजूनही रत्नागिरी व नजीकच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तसेच गोव्यातील दिव्यांगांनी नोंदणी केली नसल्यास त्यांनी त्वरित नोंदणी करावी, असे आवाहन भारत विकास परिषद दिव्यांग केंद्रातर्फे करण्यात आले आहे.येत्या २४ मे रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० या वेळेत साळवी स्टॉप येथील श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालयात मोजमाप शिबिर होईल. याद्वारे गरजू दिव्यांगांना उच्च दर्जाचे आधुनिक मॉड्यूलर कृत्रिम पाय मोफत दिले जाणार आहेत. यापूर्वी अशी शिबिरे चिपळूण, मार्गताम्हाणे येथे आयोजित केली होती.भारत विकास परिषद दिव्यांग केंद्राचे विश्वस्त विनय खटावकर, शिबिर समन्वयक ॲड. दीपक पटवर्धन यांनी आवाहन केले आहे की, अजूनही कोणी नावनोंदणी करायचे राहिले असल्यास लगेचच नोंदणी करावी. जेणेकरून त्यांच्या पायाचे मोजमाप शिबिरात घेता येऊ शकेल. गरजू दिव्यांगांनी त्वरित नोंदणी करणे आवश्यक आहे.ङ्गङ्गबाजारात या आधुनिक कृत्रिम पायांची किंमत ५० हजार रुपयांपेक्षा जास्त आहे, मात्र स्कॉन प्रो. फाउंडेशनच्या सामाजिक निधीतून हे पाय पूर्णपणे मोफत दिले जाणार आहेत.

## शहरांमधील बांधकाम आणि पाडकामाच्या ढिगाऱ्यांवर आता सरकारचा वॉच!

मुंबई : इमारतींच्या पुनर्विकासातून शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या बांधकाम आणि पाडकामाच्या कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावणाऱ्या विकासकांना चाप लावण्यासाठी राज्य सरकारने विशेष नियोजन सुरू केले आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाच्या नियमावलीनुसार, राज्यात आता अशा कचऱ्याच्या विल्हेवाटीवर थेट मंत्रालयीन पातळीवरून बारीक लक्ष ठेवले जाणार आहे. यासाठी राज्य शासनाने एका उच्चस्तरीय राज्यस्तरीय सनियंत्रण समितीची स्थापना केली असून, पर्यावरण व हवामान बदल विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. यामुळे यापुढे नियम मोडणाऱ्या बिल्डर्स आणि विकासकांवर थेट फौजदारी आणि दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २ एप्रिल २०२५ रोजी देशभरासाठी बांधकाम आणि पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम, २०२५ ची अधिसूचना जारी केली होती. हे नियम १ एप्रिल २०२६ पासून संपूर्ण देशात लागू झाले आहेत. या नियमांमधील कलम २२ (३) नुसार प्रत्येक राज्य सरकारला या नियमांच्या अंमलबजावणीसाठी आणि देखरेखीसाठी पर्यावरण विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक शक्तिशाली देखरेख समिती स्थापन करणे बंधनकारक केले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने या समितीची घोषणा केली असून, कचऱ्याच्या बेकायदेशीर डम्पिंगविरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

या राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या अध्यक्षतेची धुरा पर्यावरण व हवामान बदल विभागाचे सचिव स्वतः सांभाळणार आहेत.



या समितीमध्ये राज्यातील विविध महत्त्वाच्या विभागांचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून काम पाहतील. यामध्ये नगर विकास विभाग, ग्रामीण विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) आणि गृह विभाग (वाहतूक) यांचे सचिव किंवा प्रधान सचिव यांचा समावेश आहे. तसेच मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे यांसारख्या मोठ्या महानगरपालिकांचे आयुक्त, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पुणे येथील प्रादेशिक संचालक या समितीत मुख्य भूमिका बजावणार आहेत.कचरा दिसल्यास अधिकारी जबाबदार राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सर्व नगरपालिका व नगरपंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या बांधकामांच्या आणि पाडकामाच्या कचऱ्याची (उदा. सिमेंट, विटा, दगड, माती) शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जात आहे की नाही, यावर प्रत्यक्ष वॉच ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कचरा उघड्यावर आढळल्यास संबंधित स्थानिक अधिकाऱ्यालाही जबाबदार धरले जाऊ शकते. फायदा काय?मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरांमध्ये सध्या पुनर्विकास आणि मोठ्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची कामे वेगाने सुरू आहेत. अनेकदा विकासक हा पाडकामाचा कचरा रात्रीच्या वेळी उघड्यावर, डम्पिंग ग्राऊंडवर किंवा खाडी किनाऱ्यावरील संवेदनशील पाणथळ जागी बेकायदेशीरपणे टाकून पळ काढतात.

## ट्युशन फी, डेव्हलपमेंट फीची माहिती देणे बंधनकारक; उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे महाविद्यालयांना निर्देश

मुंबई : उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्काबाबत संपूर्ण आणि अद्ययावत माहिती उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. याबाबतचे निर्देश सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलसचिवांना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत.



बारावी निकालानंतर सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर, महाविद्यालयांनी विद्यापीठ किंवा शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार आकारण्यात येणारे प्रवेश शुल्क, ट्युशन फी, डेव्हलपमेंट फी व इतर शुल्काची अद्ययावत माहिती कॉलेजच्या सूचना फलकावर लावणे अनिवार्य आहे तसेच प्रवेश शुल्कासह संपूर्ण शुल्काची माहिती बंधनकारक आहे.

तक्रारी निर्माण होणार नाहीत, याची काळजी घ्या!

शुल्काबाबतची माहिती सूचना फलकावर आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिसण्याबाबतची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांच्यावर राहणार आहे. सर्व विभागीय सहसंचालक आणि राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलसचिवांनी ही बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून तत्काळ सूचित करावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी दिले आहेत. या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवणार नाही, याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी तसेच कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, असे उच्च शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

सूर्योदय



संपादकीय

## उष्माघाताचे संकट!

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून हवामान बदलाचा एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत येलो अलर्ट जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. श्रम उत्पादकता कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९ सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा हॉटस्पॉट ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली.

# IAS ऑफिसर होण्याचे स्वप्न पूर्ण करणार - कु. समृद्धी सुरेश आंबेकर

आबलोली (संदेश कदम)

आई - वडिलांच्या आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली जिद्दीने आणि प्रचंड परिश्रम घेऊन ऑफिसर होण्याचे स्वप्न पूर्ण करणार असल्याचे स्पष्ट मत गुहागर तालुक्यातील वाघांबे गावची सुकन्या आणि गुहागर तालुक्यातील पाटपन्हाळे हायस्कूलची विद्यार्थिनी कु. समृद्धी सुरेश आंबेकर हिने व्यक्त केले.

नुकत्याच झालेल्या इयत्ता १० वीच्या बोर्डाच्या परीक्षेत पाटपन्हाळे हायस्कूलची कु. समृद्धी सुरेश आंबेकर हिने ९९.२०% मिळवून गुहागर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. समृद्धीच्या या यशाचं गुहागर तालुक्यातील सर्वच स्तरांमधून अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत. समृद्धीच्या या यशाबद्दल आमच्या प्रतिनिधीने तिचे अभिनंदन करून तिच्याशी संवाद साधला असता आई वडील आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ऑफिसर होण्याचे स्वप्न पूर्ण करणार असल्याचे समृद्धीने सांगितले. ङ्ग कु.समृद्धी सुरेश आंबेकर पुढे म्हणाली की, आज मला जे यश मिळाले ते माझ्या आई-वडिलांमुळे आणि माझ्या मार्गदर्शक शिक्षकांमुळेच.सर्वात प्रथम जेव्हा आपण इयत्ता ९वी तून १०वीत जातो तेव्हा मनात भीती असते की पुढे काय होईल?, कसं होईल?



पण माझ्या आई-वडिलांनी आणि माझ्या शिक्षकांनी माझ्या मनातील भीती सर्वप्रथम काढून टाकली त्यानंतर मी १० वीची परीक्षा कशी असते?, एकंदरीत परीक्षा कुठच्या महिन्यात होते? पेपर कसे असतात. जाणून घेतले आणि अभ्यासाला सुरुवात केली. आपल्याकडे जनरली एक असा समज आहे की, इयत्ता १०वीचा अभ्यास हा सकाळी लवकरच उठून किंवा रात्री उशिरा जागून केला जातो. परंतु मी तसं काहीही केलं नाही मी माझे जे पहिली पासून इयत्ता ९वी पर्यंत जे रुटीन होतं त्या रुटींग मध्येच अभ्यास केला. सकाळी ०७: ३० वाजल्यापासून ते रात्री ०२:०० वाजेपर्यंत मी अभ्यास केला आहे. यामध्ये सकाळी ०७:३० ते ०९:०० वाजेपर्यंतचा वेळ मी वाचनाला दिला. आणि शाळेतून घरी आल्यावर सायंकाळी ०५:००ते रात्री ०२:०० वेळेत सर्व लिखाण पूर्ण करायची. त्यानंतर जशी जशी परीक्षा जवळ आली. तशी तशी मी सायन्स, मॅथर्स यासारख्या विषयांचा अभ्यास करण्यावर जास्त भर दिला आणि मराठी इंग्लिश हिंदी संस्कृत किंवा इतिहास असेल या विषयांचा कंटिन्यू अभ्यास चालू ठेवला ङ्ग स्पर्धा परीक्षा किंवा निबंध स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, वकृत्व स्पर्धा यामध्येही तू उज्वल हे संपादन केले आहे. या बाबतीत बोलताना कु. समृद्धी सुरेश आंबेकर म्हणाली की, दर वेळेला एखादी स्पर्धा जाहीर झाली की, शाळेतील सर्व शिक्षक प्रथम मला सांगायचे की अशी अशी स्पर्धा आहे. या स्पर्धेत तुला जायचे आहे. पण सुरुवातीला थोडी भीती वाटायची मी इयत्ता ५वी पासून या स्पर्धांमध्ये सहभागी व्हायची तशी तशी माझी भीती हळूहळू कमी झाली. आणि स्पर्धा परीक्षांची उत्सुकता वाढू लागली काही स्पर्धा मला ऑनलाईन समजायच्या मी ऑनलाईन बघायचे बघायची आणि तशी तशी तयारी करायची ङ्ग इयत्ता ९वी मधून १० वीला जे विद्यार्थी जाता आहेत त्या विद्यार्थ्यांची तुझ्यासारखी तयारी झाली पाहिजे काय टिप्स देशील त्यांना या प्रश्नावर कु. समृद्धी सुरेश आंबेकर म्हणाली की, सर्वप्रथम मी त्या सर्व विद्यार्थ्यांना सांगेन की, इयत्ता १० वीची परीक्षा आहे. म्हणून घाबरून आणि गोंधळून जाऊ नका?१०वीच्या परीक्षा या शालेय वातावरणात होत असल्यामुळे त्याविषयी अजिबात भीती बाळगू नका. आपल्या परिसरातील शाळा हेच परीक्षेचे केंद्र असते त्यामुळे काळजी करायचे कारण नाही तुम्ही जर प्रामाणिकपणे अभ्यास केला असेल तर पेपर अगदी फ्रेश मध्ये छान लिहिता येतात. जसा तुम्ही पहिली पासून अभ्यास करत होतात तसाच अभ्यास . वेळेचे नियोजन करा आणि फक्त त्यात छोटे मोठे बदल करा आई-वडिल आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध अभ्यास करा यश निश्चित मिळेल असा संदेशहि कु. समृद्धी सुरेश आंबेकर हिने दिला

# अखिल भारत गुजराती समाज गुजराती गौरव संपर्क आणि मार्गदर्शन सभा

विशेष प्रतिनिधी
नंदकुमार चांदोरकर

महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील महाड येथे प्रथमच अखिल भारत गुजराती समाज या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेची विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील गुजराती बांधवांशी संपर्क वाढवणे आणि समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे हा या सभेचा मुख्य उद्देश आहे.


या सभेसाठी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई जे. पटेल (भोपाळ, मध्य प्रदेश) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ही सभा रविवार, ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत हॉटेल पी. जी. रिजेन्सी हॉल, मुंबई-गोवा महामार्ग, महाड येथे संपन्न होणार आहे.

सभेचे आयोजन शेठ धनजीभाई जीवनदास परिवार, महाड (रायगड) यांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमास रायगड जिल्हा तसेच परिसरातील विविध गुजराती संस्थांचे प्रतिनिधी, समाजसेवक आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महाड परिसरात प्रथमच अशा प्रकारच्या राष्ट्रीय स्तरावरील गुजराती समाज सभेचे आयोजन होत असल्याने गुजराती समाजामध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अखिल भारत गुजराती समाज संस्थेची प्रमुख उद्दिष्टे :



१) अखिल भारत गुजराती समाज ही राष्ट्रीय स्तरावरील गुजराती समाजाची मातृसंस्था आहे.

२) भारत तसेच परदेशातील विविध गुजराती संस्थांना एकत्र जोडून 'फेडरेशन' म्हणून कार्य करणे.

३) देशभरातील गुजराती समाज भवनांमध्ये निवास व भोजन व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी समन्वय साधणे.

४) ''एक समाज, श्रेष्ठ समाज'' या ब्रीदवाक्यांतर्गत सर्व समाजांना संघटित करणे.

५) गुजरात राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे संस्थेचे मुख्य संरक्षक म्हणून कार्यरत असतात.

६) गुजरात सरकारच्या ( - ) शी संलग्न राहून अनिवासी गुजराती बांधवांना विविध योजनांचा लाभ मिळवून देणे.

७) सदस्यांमध्ये राष्ट्रीय स्तरावर संपर्क, समन्वय आणि व्यवसायिक तसेच सामाजिक संबंध दृढ करणे.

८) गुजरातबाहेरील गुजराती बांधवांच्या कायदेशीर, प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक अडचणी सोडवण्यासाठी ''सरदार पटेल सुरक्षा योजना'' राबविणे.

९) केंद्र व राज्य शासनाच्या वैद्यकीय, शैक्षणिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला सक्षमीकरण योजनांची माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

१०) गुजराती संस्कृती, परंपरा आणि मातृभाषेचे जतन व संवर्धन करणे.

११) ज्या ठिकाणी 'गुजरात भवन' उपलब्ध नाही, त्या ठिकाणी त्याच्या निर्मितीसाठी शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

# माटवन गावामध्ये जीवन मिशन अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांचा केक कापून वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा

दैनिक सूर्योदय केळशी प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ग्रामदेवता झोलाई देवी यांच्या चरणी नतमस्तक होऊन, दापोली माटवण येथे रविवारी दि. १० मे२०२६रोजी मिशन जीवन या उपक्रमांतर्गत गावातील ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस आणि सन्मान सोहळा अत्यंत आनंद व उत्साहाच्या वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात गावाच्या ज्येष्ठांचे वाढदिवस केक कापून आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरे करण्यात आले.ङ्गया प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून दापोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेशजी तोरकसर आणि पोलीस उपनिरीक्षक राजकुमार यादव उपस्थित होते.



तोरकसर यांचा सत्कार मुंबई मंडळ अध्यक्ष श्रीधर नारायण महाडिक यांच्या हस्ते, तर यादव यांचा सत्कार मुंबई मंडळ उप अध्यक्ष संभाजी महाडीक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जि.प. सदस्या मीनाक्षी विनय शेगडे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. वाढदिवस सत्कारमूर्ती:१. ) भाऊ आणि वंदना महाडिक२. ) विश्वनाथ आणि विदुला महाडिक३. ) शिवाजी (आप्पा) आणि सुवर्णा महाडिक४. )मा. जि. सैनिक मनोहर आणि नीलम महाडिक५.) माजी पोलीस पाटील सिद्धार्थ मर्चंडे ६. ) सुभाष आणि स्वाती महाडिकङ्गकार्यक्रमाला गावातील ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# गुहागर तालुक्याचे सुपुत्र आणि प्रा. अमोल पवार यांचे रक्तदान ठरले मोलाचे

आबलोली (संदेश कदम)

पत्रकारिता क्षेत्रा बरोबरच सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करणारे गुहागर तालुक्यातील काजुर्ली गावचे सुपुत्र व सध्या गुहागर तालुक्यातील आबलोली येथे स्थायिक झालेले आणि वझे केळकर महाविद्यालय मुलुंड मुंबई येथे प्राध्यापक म्हणून नोकरीत कार्यरत असलेले



प्राध्यापक अमोल महादेव पवार यांनी चिपळूण तालुक्यातील मांडकी - पालवण येथील मोरे यांच्यासाठी स्वखर्चाने जाऊन रक्तदान केले आणि त्यांची लगेच शस्त्रक्रिया चालू झाली. प्राध्यापक अमोल पवार यांच्या रक्तदानाचे मोल झाले असून रक्तदान हेच श्रेष्ठदान आहे. हे प्राध्यापक अमोल पवार यांनी कृतीतून दाखवून दिल्याने गुहागर तालुक्यातील विविध सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्राध्यापक अमोल पवार यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिवसेना चिन्ह वादाची सुनावणी : नेत्यांनी जबाबदारीने बोलावे, सर्वोच्च न्यायालयाचा इशारा

नवी दिल्ली : शिवसेना चिन्हाच्या वादाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होत नसल्याचा आरोप करणाऱ्या काही राजकीय नेत्यांच्या बेजबाबदार विधानांवर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि असे वर्तन स्वीकारले जाणार नाही, अशा शब्दांत न्यायालयाने नेत्यांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्या. जोयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने या प्रकरणातील पक्षकारांना अशा प्रकारच्या वर्तणुकीपासून दूर राहण्यास सांगितले आहे.

आम्ही तारखा निश्चित करू, पण त्याआधी तुमच्या लोकांना माध्यमांकडे जाण्यापासून आणि सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत नाही,




अशी बेजबाबदार विधाने करण्यापासून रोखा, अशा शब्दांत संतप्त सरन्यायाधीशांनी उद्धव ठाकरे गटाच्या वकिलांना सुनावले. तुम्ही येथे तारखा मागता आणि नंतर कोर्ट निर्णय घेत नसल्याचे बाहेर सांगता, आम्ही इशारा देत आहोत. तुमचे शब्द जपून वापरा. अशा प्रकारचे वागणे मी मान्य करणार नाही, असेही सरन्यायाधीश म्हणाले. दोन्ही बाजूंकडून सहकार्याची अपेक्षा असल्याचे सांगतानाच, काही राजकीय नेते अशी विधाने का करत आहेत, असा सवाल खंडपीठाने उपस्थित केला.

पुढील सुनावणी ३० जुलैला

आम्ही येथे संध्याकाळी ४ वाजेपर्यंत बसतो आणि आम्ही रिकामे बसलो आहोत असे कोणाला वाटत असेल, तर आम्हाला ते समजू शकत नाही, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले. उद्धव ठाकरे गटातर्फे हजर झालेले ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी स्पष्ट केले की, वकील कधीही अशा विधानांचे समर्थन करणार नाहीत आणि न्यायालयाच्या सोयीनुसार आम्ही युक्तिवाद करण्यास तयार आहोत. खंडपीठाने आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जुलै रोजी निश्चित केली आहे. निवडणूक आयोगाने धनुष्यबाण हे चिन्ह आणि पक्षाचे नाव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला देण्याच्या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याच विषयाशी संबंधित दोन याचिकांवर न्यायालय सुनावणी करत आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये अनेक समान मुद्दे गुंतलेले असल्याने शिवसेना प्रकरणाच्या सुनावणीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (एनसीपी) वादावर युक्तिवाद ऐकले जातील, असे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे यांच्यासह १६ आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार दिल्यानंतर, ठाकरे गटाने या निर्णयालाही बेकायदेशीर ठरवत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

# राज्यभरात उन्हाच्या तीव्र झळा; २२ जिल्ह्यांत पारा ४५ अंशावर

मुंबई : राज्यभरात उन्हाच्या तीव्र झळा सोसाव्या लागत आहेत. अवघ्या आठ दिवसांपूर्वी राज्यातील केवळ सहा जिल्हे आणि २ तालुक्यांत तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पुढे होता. आता मात्र राज्यातील एकूण २२ जिल्हे आणि तब्बल १८३ तालुके उन्हाच्या तडाख्यात सापडले असून, येथील तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. राज्य मंत्रिमंडळासमोर सादरीकरणातून ही बाब समोर आली आहे.



राज्य मंत्रिमंडळाच्या गुरुवारच्या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडून राज्यभरातील तापमानाची बदलती स्थिती, अवकाळी पाऊस आणि वीज कोसळून झालेल्या जीवितहानीबाबत सादरीकरण करण्यात आले.७ मे या दिवशीचा एकमेव अपवाद वगळता दररोज विविध जिल्हे आणि तालुक्यांतील पारा वाढून ४५ अंशांच्या पुढे जात असल्याचे निदर्शनास आले आहे. सोमवार, ११ मे रोजी १६ जिल्ह्यांतील ५१ तालुक्यांत पारा ४५ अंशांवर पोहोचला होता. त्यानंतर सलग दोन दिवस १०६ आणि १८३ तालुक्यांतील तापमानाचा पारा वाढलेला असून, ४५ च्या पुढे गेला आहे.दरम्यान, या 'हीट वेव्ह'चा सामना करण्यासाठी प्रशासनाने अलर्ट जारी केल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, या काळात वीज कोसळून दहा लोकांसह २७ प्राणी दगावल्याचीही माहिती देण्यात आली. ३ हजार २८ धरणांत ५०३.७६ टीएमसी पाणीसाठा राज्यातील सहा महसुली विभागांतील एकूण ३ हजार २८ धरणांत ५०३.७६ टीएमसी इतका उपयुक्त पाणीसाठा म्हणजे ३५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्यावर्षी ३० टक्के पाणीसाठा होता. मोठ्या, मध्यम आणि लघू प्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठादेखील मागील वर्षीच्या तुलनेत यंदा जास्त आहे. हीच स्थिती राज्यातील १२ मोठ्या धरणांतील पाणीसाठ्याबाबत आहे. मात्र, यंदा उन्हाची तीव्रता जास्त असून, 'अल निनो'मुळे पाऊस लांबण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे पाणी काटकसरीने वापरण्याची आवश्यकता आहे.

# दहावीनंतरच्या विद्यार्थ्यांसाठी देवरुखात करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन पी. एस.बने इंटरनॅशनल स्कूल ज्युनिअर कॉलेज आणि आर्चिटन्र्स स्टुडंट्स ट्युटोरिय यांचा उपक्रम

देवरुख (ओंकार रेळेकर)ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आय.आय.टी,डॉक्टर,इंजिनिअर होण्याची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने पी.एस. बने इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच आर्चिटन्र्स स्टुडंट्स ट्युटोरियङ्क यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१७ मे रोजी स.११ वाजता देवरुख मधील मराठा भवन देवकाते येथे करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर दहावीनंतर योग्य करिअरची दिशा निवडण्यासाठी उपयुक्त ठरणार असून , आणि - परीक्षांविषयी विशेष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसह पालकांनाही विविध करिअर पर्याय सायन्स,कॉमर्स,आर्ट्स शाखांबाबत माहिती, / / मेडिकल क्षेत्रातील संधी तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी कशी सुरू करावी याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.या शिबिरात विद्यार्थ्यांना योग्य दिशा, योग्य तयारी आणि योग्य मार्गदर्शन यांचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील अनेक हुशार विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शनाच्या अभावामुळे स्पर्धा परीक्षांमध्ये अपेक्षित यश मिळत नसल्याचे वास्तव लक्षात घेऊन ही संकल्पना राबविण्यात आली आहे. शिबिरात / तज्ज्ञ मार्गदर्शक, - सायन्स सोबत / / - तयारी, व , वैयक्तिक तसेच शांत आणि अभ्यासपूर्ण वातावरण याबाबत माहिती दिली जाणार आहे.या कार्यक्रमाला माजी आमदार व सचिव, महाराष्ट्र शिक्षण संस्था डॉ. सुभाषजी बने, पी. एस. बने इंटरनॅशनल स्कूलचे संचालक डॉ. रोहन बने यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तसेच आर्चिटन्र्स स्टुडंट्स ट्युटोरियचे संचालक श्री.विजय तिवारी आणि पी. एस. बने इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य श्री. सोमनाथ मिटकरी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.अधिक माहितीसाठी ८४५९५३००४५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# लोकरंग

१)साप्ताहिक संवाद

इंधन बचत हीच खरी देशसेवा

पेट्रोल,डिझेल,किंवा सी एन जी सारखी जीवाश्म नैसर्गिक इंधन ही मर्यादित आहेत.अर्थात म्हणूनच,या इंधनाचा वारेमाप उपसा आणि वापर



हा देशालाच नाही तर जगभरातील कोणत्याही देशाला परवडणारा नाही.या इंधनावरच जगाचं रहाट गाडग अव्याहत पने सुरू आहे.अर्थात विद्युत वाहन किंवा सौर ऊर्जेवर चालणारी वाहन हा पर्याय नैसर्गिक इंधनापुढे अपुरा आहे.इंधन बचत काळाची गरज अस अनेक माध्यमातून आपण वाचत ऐकत आलेलो आहोत.परंतु जागतिक स्तरावर इंधनाचा तुडवडा लक्षात घेता आता खऱ्या अर्थाने अगदी देशातील.प्रत्येक नागरिकाने आपल्या परीने इंधन बचत करण ही गरजच नाही तर अपरिहार्यता झालेली आहे.याच अनुषंगाने भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे राज्यनिहाय समन्वयक उमेश कुलकर्णी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१) केंद्र सरकारने इंधन बचतीचा निर्णय घेण्यामागे कारण काय?

सर्वात महत्वाच कारण म्हणजे आखाती देशात अमेरिका आणि इराण या दोन देशांमध्ये जे युद्ध सुरू आहे त्याचे थेट परिणाम.म्हणजे जगभरात इंधनाचा तुडवडा भासू लागला आहे.पेट्रोल,डिझेल.किंवा सी एन जी सारख्या जीवाश्म.इंधनाच्या बाबतीत आपला देश हा ८० टक्के आखाती देशावर अवलंबून आहे.इंधनाच्या बाबतीत आपण आत्मनिर्भर बनू शकत नाही.कारण इंधनाचे नैसर्गिक साठे हे आखाती देशामध्ये.मोठ्या प्रमाणात आहेत.मात्र युद्धानंतर आता तिथली परिस्थिती देखील दोलायमान आहे.म्हणूनच जागतिक स्तरावर इंधनाचे दर हे भडकले आहेत.परिणामी आपल्या देशात देखील आता इंधनाचे दर भडकू लागले आहेत.म्हणूनच आता काळाची गरज नव्हे तर अपरिहार्यता म्हणून वैयक्तिक स्तरावर प्रत्येक देशवासीयाने इंधन बचत करायलाच हवी.म्हणून सरकारने हा निर्णय जाहीर केलेला आहे.

२)वैयक्तिक स्तरावर इंधन बचतीचे कोणते पर्याय आहेत?

देशातील प्रत्येक.नागरिक सध्याची इंधनाच्या बाबतीतील आणीबाणी लक्षात घेऊन आपल्या



परीने इंधनाची बचत करू शकतो.सर्वात महत्वाच म्हणजे पुढील काळात खाजगी वाहनांचा वापर बंद करून बस, रेल्वे , मेट्रो सारख्या सार्वजनिक वाहनाचा वापर करणे गरजेचे आहे.त्याच वेळी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवायला हवा.हरित इंधनावर चालणाऱ्या वाहनाना देखील.प्राधान्य द्यायला हवे.सौर ऊर्जेचा वापर केवळ मोटार गाड्यांसाठीच नव्हे तर सौर चुली करिता आणि सौर दिव्यकरीता वाढवला पाहिजे.जवळपासच्या प्रवासकरिता सायकल.सारखे प्रदूषणविरहित वाहन वापरायला हवे.शिवाय शक्य असेल तिथे कार्यालयीन कामकाज ऑनलाइन केले तर किती तरी इंधनाची बचत होईल.एका अर्थाने आता इंधन बचत हीच खरी देशसेवा असणार आहे

३)इंधनाच्या नैसर्गिक स्रोतांचा पर्याय भविष्यातील इंधनाचे संकट संपवेल का?

नाही.जीवाश्म इंधनाचे बाबतीत आपला देश जसा परावलंबी आहे त्या.प्रमाणेच इलेक्ट्रिक सारखा पर्याय आपल्याकडे उपलब्ध झालेला आहे.परंतु याला मर्यादा आहेत.कारण देशभरात पुरेसे चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचे आव्हान.आहेच शिवाय वीज निर्मितीला देखील मर्यादा आहेत.सूर्यापासून मिळणारी सौर ऊर्जा हा एक उत्तम.आणि.प्रदूषणविरहित मोफत इंधनाचा स्रोत आहे खरा परंतु तो संथ गतीचा आहे.परंतु सौर ऊर्जेचा वापर हा मोठ्या प्रमाणात वाढवायला हवा.उसाच्या चिपाडापासून हरित इंधनाच्या पर्यायाला देखील काही मर्यादा आहेतच.त्यामुळे इंधनाचा स्रोत कोणताही असला तरी या इंधनाचा वापर काटकसरीने आणि जपून. करणे अत्यंत गरजेचे आहे.वैयक्तिक स्तरावर अगदी स्वयंपाकाचा गॅस देखील कमीत कमी कसा वापरता येईल हे पाहावे लागेल.तरच या इंधनाचा पुरवठा पुढील पिढ्यापर्यंत टिकवता येईल.

२ नोंद महालक्ष्मी सरस २०२६ चे ५० कोटी व्यवसायाचे उद्दिष्ट.

उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत बीकेसी येथे २ मे पासून सुरू असलेल्या 'महालक्ष्मी सरस २०२६' प्रदर्शनाला मुंबईकरांकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे. मंत्री जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रदर्शनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, ग्रामीण महाराष्ट्राची संस्कृती, खाद्यपरंपरा, हस्तकला आणि महिला उद्योजकतेचा अनोखा संगम येथे अनुभवायला मिळत आहे.ग्रामीण महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना जागतिक ओळख, कायमस्वरूपी बाजारपेठ आणि मोठे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाचे प्रदर्शन अधिक आधुनिक व आकर्षक स्वरूपात साकारले आहे. या संकल्पनेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष मान्यता व पाठबळ दिले. त्यामुळे हे प्रदर्शन जागतिक दर्जाचे सांस्कृतिक व व्यावसायिक व्यासपीठ ठरत आहे.राज्यभरातील लाखो महिला बचत गटांनी तयार केलेले दागिने, साड्यांचे कलेक्शन, बांबूच्या वस्तू, घरगुती सजावटीचे साहित्य, ग्रामीण कलाकुसरीचे नमुने येथे विक्रीसाठी आहेत. सेंद्रिय गूळ, पापड, लोणची, मसाले, चटण्या, पुरणपोळ्या आणि ग्रामीण भागातील खास खाद्यपदार्थांनाही मुंबईकरांची पसंती मिळत आहे. ९ मे रोजी एका दिवसात ६ कोटी रुपयांची विक्री झाली. आतापर्यंत प्रदर्शनातून ३२ कोटींची उलाढाल झाली असून, यंदा ५० कोटींपेक्षा अधिक व्यवसाय होण्याची शक्यता आहे. यापूर्वी नागपूरला १६ कोटी व वाशी येथे २२ कोटींची उलाढाल झाली होती. मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता प्रदर्शनाची मुदत १७ मे पर्यंत वाढवण्यात आली आहे.आणि उद्दिष्ट ५० कोटी व्यवसायाचे आहे.

३ चला पर्यटनाला

सफर अलिबागची

अलिबाग आणि आजूबाजूचा परिसर हा समुद्र किनाऱ्यांसाठी जास्त प्रसिध्द आहे. पण या पलीकडे ही बरंच काही बघण्यासारखं आणि फिरण्यासारखं आहे.तुम्ही किनारे , मंदिरे, गड/सागरी किल्ले , यासारखे वेगवेगळे पर्याय आहेत. अलिबाग चा कुलाबा किल्ला –फक्त यासाठी भरती ओहोटी यांची वेळ बघून जाऊ शकता. जवळपासचे समुद्र किनारे आहेत नागाव, वरसोली ,किहीम जे ५ ते १० मिनटांच्या अंतरावर आहेत. बीच ला जायचे नसेल आणि छोटा ट्रेक करताना एक प्राचीन मंदिर आणि जवळपासचा सुंदर परीसर फिरायचा असेल तर कनकेश्वर हा एक खूप चांगला पर्याय आहे. यासाठी २ तास तरी कमीत कमी द्यायला लागतील. किहीम ला जाणार असाल तर पुढे १५ मिनिटांवर सासवण्याला करमरकर यांचे शिल्पालय आहे .एकदा जरूर बघू शकता. मांडवा किनारा आणि जेट्टी तिकडून फ़क्त ५ मिनिटांवर आहे.काशीद किनारा आणि पुढे मुरुड, जंजिरा किल्ला हाही एक ३४ तासांचा दुसरा पर्याय होऊ शकतो. नागाव किनाऱ्यावरुन जर पुढे जायचे असेल तर कोर्लईचा किल्ला हा एक थोडा हटके असू शकतो जो एक गजबजाटापासून खूप वेगळा अनुभव नक्कीच असेल.तुम्ही आपल्या आवडीप्रमाणे नियोजन करून एक दिवसात फिरू शकता



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार १७ मे २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## देशभरातील मेडिकल सेवा २० मे राहणार बंद

मुंबई - ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्सने २० मे २०२६ रोजी देशभरातील मेडिकल दुकाने आणि औषध वितरक बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ई-फार्मसी कंपन्यांविरोधात आणि ऑनलाइन औषध विक्रीवरील अपुऱ्या नियमनाच्या निषेधार्थ हा एकदिवसीय बंद पुकारण्यात आला आहे.ङ्ग देशभरातील सुमारे १२.४० लाख केमिस्ट दुकाने आणि ड्रग डिस्ट्रीब्यूटर्स या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रासह गुजरात, दिल्ली, उत्तर प्रदेश, आसाम, गोवा आणि नागालँडमध्ये या बंदचा मोठा परिणाम जाणवण्याची शक्यता आहे. विशेषतः मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या शहरांमध्ये अनेक मेडिकल स्टोअर्स बंद राहू शकतात.ङ्गकेमिस्ट संघटनांच्या म्हणण्यानुसार, ई-फार्मसी प्लॅटफॉर्मवर प्रिस्क्रिप्शनची योग्य तपासणी केली जात नाही. एआयच्या मदतीने बनावट प्रिस्क्रिप्शन तयार करून अँटिबायोटिक्स, ऑपिऑइड्स, व्यसनाधीन करणारी औषधे आणि काही बंदी असलेली औषधेही विकली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात डिस्काउंट देऊन ग्राहकांना आकर्षित केले जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. काही प्रकरणांमध्ये एक्सपायरीच्या जवळ आलेली औषधे विकली जात असल्याचाही आरोप आहे. यामुळे रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, तसेच अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




## १ जून ते ३१ जुलैं कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधी क्षेत्रात यांत्रिक नौकांना मासेमारी बंदी

रत्नागिरी, (जिमाका) : महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अन्वये यावर्षी दि.१ जून ते ३१ जुलै २०२६ (दोन्ही दिवस धरुन ६१ दिवस) या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधी क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिकी नौकांद्वारे समुद्रात मासेमारी केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां) सा.वि. कुवेसकर यांनी केले.ङ्ग



या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करुन मासेमारी करणारे मच्छिमार खालील कारवाईस पात्र होतील.ङ्ग पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील. सदर पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर- यंत्रचालित नौकांना लागू राहणार नाही. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि. १ जून २०२६ पूर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच दि. ३१ जुलै २०२६ वा त्यापुर्वी सदर नौकांना समुद्रात मासेमारीकरिता जाता येणार नाही. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीबाबतचे धोरण / मार्गदर्शक सूचना / आदेश लागू राहतील.ङ्ग राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना आढळल्यास / केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ च्या कलम १४ अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल तसेच कलम १७ मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल. पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिध्द आहे. तरी सर्व मच्छिमारी सहकारी संस्था, त्यांचे नौकामालक, सभासद व अन्य संबंधितांनी सदर प्रसिध्दी निवेदनाची नोंद घेवून विहीत बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिकी नौकांद्वारे समुद्रात मासेमारी केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

## आकाशवाणी रत्नागिरी केंद्रांतर्फे प्रसारणाच्या ९० व्या वर्षपूर्तीनिमित्त सुगम संगीत मैफिलीचे आयोजन

रत्नागिरी ( प्रतिनिधी ) आकाशवाणीच्या गौरवशाली प्रसारणाच्या ९० व्या वर्षपूर्तीनिमित्त आकाशवाणी रत्नागिरी केंद्रांतर्फे सुगम संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही मैफिल बुधवार दिनांक २० मे रोजी सायंकाळी ७ ते ९ यावेळेत स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात सादर होणार असल्याची माहिती कार्यालय प्रमुख अधीर गढपाले आणि कार्यक्रम प्रमुख डॉ. सुनील गायकवाड यांनी




दिली.ङ्गङ्गआकाशवाणीच्या गौरवशाली प्रसारणाच्या ९० व्या वर्षपूर्तीनिमित्त महाराष्ट्रभरातील सर्व आकाशवाणी केंद्रांतर्फे विविध सांस्कृतिक, सांगितिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रत्नागिरी आकाशवाणी केंद्रही मागे नाही. रत्नागिरी केंद्रातर्फे सुगम संगीत मैफिल आयोजित करण्यात आले आहे. या मैफिलीत गायिका वैदेही करंबेळकर आणि अभिजीत नांदगावकर हे गायक कलाकार सुमधूर सुगम गीते सादर करणार आहेत. त्यांना महेश दामले (हार्मोनियम), राजू किल्लेकर ( सिंथेसायझर), उदय गोखले ( व्हायोलीन ), प्रथमेश देवधर ( तबला ) हे वादक कलाकार साथसंगत करणार आहेत. तर आकाशवाणीच्या सुप्रसिद्ध ज्येष्ठ निवेदिका निशा काळे आणि कश्मीरा सावंत निवेदनाची सूत्र सांभाळणार आहेत. याचबरोबर ध्वनीव्यवस्था उदयराज सावंत यांची आहे. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन श्री विवेक वानखडे हे पहात आहेत.ङ्गङ्गरसिकांसाठी या कार्यक्रमाला विनामूल्य प्रवेश असून रत्नागिरीकरांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आकाशवाणी रत्नागिरी केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

## पनवेल-कर्जत रेल्वे मार्गिकेचे ९५% टक्के काम पुर्ण

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव ङ्गनवी मुंबई आणि कर्जत प्रवास जलगतीने होण्यासाठी पनवेल ते कर्जत नवीन रेल्वे मार्गिका प्रकल्पाच्या कामाने आता वेग घेतला असुन या प्रकल्पाचे सुमारे ९५% टक्के काम पुर्ण झाले आहे.

मुबंई रेल्वे विकास महामडंळाने मुबंई नागरी परिवहन प्रकल्प ३ अतंर्गत हे काम हाती घेतले आहे.या मध्ये पनवेल ते कर्जत २९.६ कि.मी.लांबीचा दुहेरी मार्ग मार्गाचा करण्यांत आली आहे.या शिवाय सर्व मोठे व छोटे पुल ,उड्डाणपुल,भुयारी मार्ग ई.कामे पुर्ण झाली आहेत.कर्जत येथील उड्डाणपुल पुर्ण झाला असुन सध्या त्याठिकाणी रुळ जोडण्याचे काम वेगाने सुरु आहे.पनवेल रेल्वे उड्डाणपुलाचे कामही अंतिम टप्प्यामध्ये आहे.मोहापे आणि किरावली येथील उड्डाणपुल वाहतुकीसाठी सुरु झाली आहे.पनवेल,चिखले आणि मोहापे येथील स्थानकाच्या ईमारतीचे काम ही पुर्ण झालेली





प्रकल्प २,७८२ कोटी रुपयाच्या खर्चातुन विकसित केलेला आहे. या मार्गामुळे पनवेल कर्जत दरम्यान पर्यायी लोकल सेवा सुरु होणार आहे.कल्याण मार्गे धावणा-या रेल्वे वाहतुकीवरील मोठ्या प्रमाणात ताण कमी होणार आहे.या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली सर्व सरकारी जमीन संपादित असुन चौक व कर्जत स्थानकांवरील कामे जलदगतीने सुरु आहे.यामध्ये ६४ कि.मी.पैकी ५८ कि.मी,रुळ जोडण्याचे काम ही पुर्ण झालेले आहे.तसेच ६० कि.मी. मार्गावर खडीचे काम झालेले आहे.या मुळे आता कर्जत व पनवेलकरांची आता प्रवास करण्याची चिंता जवळपास मिटलेली आहे.

## आबलोली येथील विद्यार्थी वसतिगृहात मोफत प्रवेश सुरू

आबलोली (संदेश कदम)

महाराष्ट्र शासन समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी मान्यताप्राप्त लोकशिक्षण मंडळ आबलोली संचलित, विद्यार्थी वसतिगृह आबलोली तालुका गुहागर विद्यार्थ्यांनी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा.ङ्गसर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासह दोन पासपोर्ट साईज फोटो, मुलकी अधिकाऱ्यांचे जातीचे प्रमाणपत्र, पालकांचा उत्पन्नाचा दाखला, विद्यार्थ्यांचा



जिल्हा रत्नागिरी या वसतिगृहामध्ये सन २०२६ - २०२७ या शैक्षणिक वर्षात इ.५ वी ते इ.१२ वी पर्यंतच्या गरीब, हुशार, गरजू व होतकरू मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश घेण्यासाठी आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष सचिन चंद्रकांत बाईत व अधीक्षक राकेश रमाकांत साळवी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. आरक्षणाप्रमाणे वसतीगृहामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमाती, विशेष मागास वर्ग, आर्थिक मागास वर्ग तसेच अपंग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो. तरी सदर प्रवर्गातील रहिवासी दाखला, आधार कार्ड झेरॉक्स, रेशन कार्ड झेरॉक्स, मागील इयत्ता उत्तीर्ण झाल्याच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत व बँक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रांसह पालकान सोबत येऊन आपला प्रवेश निश्चित करावा. प्रवेश मर्यादित असल्याने प्रवेशासाठी अधीक्षक राकेश रमाकांत साळवी मोबाईल नंबर ९४०५०७१५३१ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष सचिन चंद्रकांत बाईत यांच्या मार्फत करण्यात आले आहे.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफिससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )